# हुंडा : एक सामाजिक समस्या

**निलेश प्रकाश शिंदे**

**प्रस्तावनाः**

भारतात आर्थिक विषमता फार मोठ्या प्रमाणात आहे. एका बाजूला गडगंज संपत्ती असणारे भांडवलदार आहेत; तर दुसऱ्या बाजूला अन्नाची भ्रांत असणारे लक्षावधी गरीब आहेत. अशा या दोन परस्परविरोधी समाजांत एका बाबतीत मात्र साम्य आहे आणि ती बाब म्हणजे 'हुंडाबळी'. आधुनिक काळात हुंडा पद्धत नावाचा राक्षस सर्वदूर पसरला आहे. हुंडयासारखी सामाजिक समस्या स्वातंत्र्यनंतर आजही ज्वलंत आहे. आजही आपण हुंडयापायी नववधुंचा छळ, हुंडाबळीच्या घटना ऐकतो. या पध्दतीचे निर्मूलन करणे म्हणजे प्रचलित रुढी, परंपरा विरुध्द जनजगृतीची एक प्रकारची लढाईच आहे.

हुंडा पध्दती ही आपण पुरुष महिला समानतेचा जो नारा देत आहोत त्याच्याशी विसंगतच आहे. त्यातुनच स्त्रीचे समाजातील स्थान, स्त्रीला समजात असणारी किंमत या विषयी समाजाची मानसिकता काय आहे हे कळून येते. हुंडा पध्दतीचे निर्मूलन म्हणजे ही मानसिकता बदलण्याचे मोठे आवाहन सर्व समाजापुढे आहे. हुंडा पध्दतीविषी जी मानसिकता समाजात आहे ती बदलणे तरुणांच्या व युवा शक्तीच्या हाती आहे.

**हुंडयाची व्याख्या -**

हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१ या अधिनियमातील कलम २ अन्वये हुंडा या शब्दाची व्याख्या विवाहातील एका पक्षाने विवाहातील अन्य पक्षास किंवा विवाहातील कोणत्याही पक्षाच्या आई-वडिलांना अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीने किंवा तत्पूर्वी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे दिलेली किंवा दयावयाचे कबुल केलेली कोणतीही संपती अथवा मुल्यवान रोख असा आहे. परंतू त्यामध्ये ज्या व्यक्तींना मुस्लिम व्यक्तिगत कायदा (शरीअत) लागू आहे त्या व्यक्तींच्याबाबतीत दहेज किंवा मेहर यांचा समावेश होत नाही.

**कायदेशीर तरतुद**

हुंडा देणे व घेणे ही परंपरेने अस्तित्वात असलेली अनिष्ठ प्रथा आहे. हुंडयापायी छळ होवून अनेक युवतींना वैवाहिक जीवनातून बाहेर पडावे लागत आहे व समाजात अनेक अडचणींना तोंड देत जीवन जगावे लागत आहे. या पध्दतीमुळे कुटूंबाची दुर्दशा होणे, मुले मातेच्या प्रेमापासून पारखी होणे व वैवाहिक

जीवनातून बाहेर पडलेल्या युवतींचा प्रश्नही निर्माण होतो. या सर्व समस्यांवर वचक बसावा म्हणून सरकारने हुंडा बंदी कायदा तयार केला आहे.

हुंडा प्रथेसारख्या दुष्ट रुढीला आळा बसावा आणि निरपराध विवाहित स्त्रियांचा छळ व हुंडाबळी थांबावे, यासाठीचा कायदा १ जुलै १९६१ रोजी लागू झाला. हे जरी वास्तव असले तरी इतिहास सांगतो की २५० वर्षांपूर्वी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी हुंडाबंदीचा कायदा केला होता. त्यांनी हुंडा देणाऱ्याला आणि घेणाऱ्याला शिक्षा ठोठावल्याची नोंद इतिहासात आहे. याचा अर्थ हुंडा ही दुष्ट रूढी अनेक शतकांची जुनी परंपरा आहे. परंतु आजही हुंड्याची अनिष्ट प्रथा बंद, किंवा कमीही झाली नाही. आजही महाराष्ट्रात दरवर्षी सरासरी दोनशेपेक्षा अधिक हुंडाबळी अधिकृतपणे नोंदवले जातात.

पंडित नेहरूंच्या काळात हुंडा विरोधी कायदा संसदेत मंजूर झाला. त्याचा उद्देश विवाहित महिलांचे जीवन सुरक्षित व सुखी करण्याचा होता. मात्र, कडक असूनही हा कायदा सहा दशकांनीही निष्प्रभ ठरतो आहे. याचे कारण मुळातच समाजाचा याला एकमुखी पाठिंबा नाही. हुंडा मागण्याबद्दल शिक्षा - हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१ च्या कलम ४ अन्वये कोणत्याही व्यक्तीने हुंडा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे मागितल्यास त्यास कमीत कमी ६ महिने परंतू २ वषापर्यत असु शकेल इतक्या मुदतीची कारावासाची आणि रु. १०,०००/- पर्यत असु शकेल इतकी दंडाची शिक्षा करण्याची तरतूद आहे.

हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१ च्या कलम ४ अ अन्वये कोणत्याही व्यक्तींने हुंडया संदर्भात जाहिरात छापल्यास किंवा प्रसिध्द केल्यास कमीत कमी ६ महिने परंतू ५ वर्षापर्यत असु शकेल इतक्या मुदतीची कारावासाची किंवा रुपये १५,०००/- पर्यत असु शकेल इतकी दंडाची शिक्षा करण्याची तरतूद आहे.

**सामाजिक स्थिती:**

हुंड्याचे हे जहर आज पिढ्यान्पिढ्या आपल्या समाजात भिनले आहे. त्यामुळे मुलगी झाली की आईवडिलांच्या काळजाचा ठोका चुकतो. मुलीला जन्म देणाऱ्या स्त्रीकडे उपेक्षेने पाहिले जाते. कित्येक गरीब घरांतून तर या हुंड्याच्या रूढीपायी कित्येक मुली अविवाहित राहतात. पालकांनी विवाहित मुलीला 'ती सासरी गेली, आपली जबाबदारी संपली, डोक्यावरचं ओझं उतरलं', असे न मानता जीवनभर तिच्या पाठिशी उभे राहून तिचे मनोबल वाढवले पाहिजे. येथे मुलांच्या पालकांची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरते. स्त्रीला

कुटुंबात सर्वार्थाने समान वागणूक आणि आदर सन्मान देण्याचे संस्कार मुलांवर लहानपणापासून स्वत:च्या कृतीतून देणे गरजेचे आहे.

आज शिक्षण, आधुनिकता आणि कायद्याचा काही प्रमाणावरील धाक यांमुळे विवाहात प्रत्यक्ष हुंडा घेणे सामाजिक प्रतिष्ठेचे मानले जात नसले, तरी या हुंड्याचे स्वरूप अतिशय भयानक आणि गुंतागुंतीचे बनले आहे. विवाहात व विवाहानंतर असे अनेक व्यवहार केले जात आहेत की, ज्यांना धर्म, संस्कृति, रिती यांचा मुलामा दिला जातो. लोकप्रिय संस्कृतीच्या प्रभावामुळे विवाह हे सांस्कृतिक उत्सव बनले आहे. या सर्वांची नैतिक जबाबदारी मुलीच्या पित्याला घ्यावी लागते. या स्वप्नपूर्तीसाठी मुलीच्या वडिलांना हातभार लावावा लागतो. अशाप्रकारे आज हुंड्याचे स्वरूप बदलताना दिसते.

**समारोपः**

हुंड्याच्या प्रथेचा नाश करण्यासाठी समाजात स्त्री-पुरुष समानतेची दृष्टी निर्माण केली पाहिजे. समाजाच्या विचारधारेच्या मुळाशी आपल्याला जावे लागेल. स्त्रीला पुरुषासारख्या सुखदु:खाच्या भावना असतात. इच्छा-आकांक्षा असतात. तिला समान अधिकार आहेत, ही दृष्टी समाजात रुजवली गेली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा आदर केला गेला पाहिजे. तेव्हाच हुंड्याची प्रथा आपोआपच नाहीसे होईल.

**संदर्भः**

अशोक गोरे (२०१५) - भारतीय सामाजिक समस्या - विद्या बुक्स, औरंगाबाद

काळदाते, सुधाताई (२००५) - भारतीय समाज प्रश्न आवि समस्या - विद्या बुक्स, औरंगाबाद.

काचोळे दा.धो. (२००५) - भारतीय सामाजीक प्रश्न आणि समस्या - विद्या बुक्स, औरंगाबाद.

Gangoli, Geetanjali, Indian Feminisms : Law, Patriarchies and Violence in India, Hampshire, 2007.

Mishra, Pramod Kumar, Women in South Asia : Dowry Death and Human Rights Violations, Delhi, 2000.

Oldenburg, Veena Talwar, Dowry Murder : Reinvestigating A Cultural hodunit, New Delhi, 2010.